# Answer Key

**Second Term 2026**

Time: 3 Hours | Grade: 9th | **MARATHI**

Subject Code

| G | 1 | 2 | 3 | 9 |
|---|---|---|---|---|

Total No. of Questions: 57 | Printed Pages: 06 | **Maximum Marks: 80**

**सूचना:** i) प्रश्नांचा क्रमांक स्पष्ट लिहा.

ii) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहेत.

iii) उजवीकडील अंक गुण दर्शवितात.

---

अचूक पर्याय निवडून पुढील विधाने पूर्ण करून पुन्हा लिहा. (3)

प्रत्यकी 1 गुण एकूण 3 गुण

1. लाखांचा पोशिंदा जगला पाहिजे.
2. वनस्पती या विषयावर होते.
3. त्याच्या घरी जाऊन उचलायचं.

कोणत्याही चार प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा. (4)

प्रत्येकी 1 गुण एकूण 4 गुण

4. लेखकाने मास्तरांकडून एका ऐवजी दोन पुस्तके न्यायची परवानगी मिळवली.
5. अंगणाने लेखिकेचे तसेच त्यांच्या पिढीचेही भावजीवन समृद्ध केलेले आहे.
6. आपल्या ज्ञानाचा उपयोग ~~माझ्या~~ आपल्या देश बांधवांसाठी करावा म्हणून पीएच.डी. केल्यावर डॉ. कमला सोहनी भारतात परत आल्या.
7. नामदेव लेखकांच्या घरी ~~नेहमी~~ दहा ते पंधरा वर्षे येत राहिला.
8. तानाजी, सूर्याजी व शेलार मामा रायबांच्या लग्नाचं आमंत्रण महाराजांना देण्यासाठी गडावर आले होते.

अचूक पर्याय निवडून लिहा.

9. गंगाधर गाडगीळ (1)
10. नामदेव (1)

कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी दोन ते तीन वाक्यांत लिहा. (4)

प्रत्येकी 2गुण एकूणं 4 गुण

11. पावसाळ्यात अंगण उखडते. आतील दगड वर आलेले असतात. अंगणात खेळताना पायांना दगड टोचतात शिवाय इतर धार्मिक विधी करताना अडचणी येतात म्हणून दिवाळीत अंगण करावे लागे.

अट घातली

12. डॉ. रामन यांनी कमलला अशी ~~अपघातले~~ की एक वर्ष तुला येथे प्रोबेशन वर काम करावे लागेल. त्यानंतर आम्हाला तुझं काम पसंत पडलं तरच तुला प्रवेश दिला जाईल.

13. घरी आल्यावर लेखकाने जाहीर केले की, येत्या रविवारी नामदेव आमच्या घरी येणार आहे. आताच मी त्याची अपॉइंटमेंट घेऊन आलोय.

कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी चार ते पाच वाक्यांत लिहा. (6)

प्रत्येकी 3गुण एकूण 6 गुण

14. एखाद्या तंतुवाद्यावरून कसलेल्या कलावंताने बोटं फिरवावी तसं प्रत्येक मोठा ग्रंथ वाचताना लेखकांच्या मनाची स्थिती झाली. लेखकांच्या मनात अनेक झंकार उमटू लागले. पक्षी भराऱ्या मारू लागले. इंद्रधनुष्यं उमटली, वैरण वाळवंट त्यांनी तुडविली. लेखकांच्या मनातले साचे पुन्हा पुन्हा छिन्नविच्छिन्न झाले आणि नव्याने घडवले गेले.

15. कार्तिक मासात तुळशीविवाह जवळ आला की तुळस घालण्याची आईची लगबग सुरू व्हायची. त्यासाठी ती टेम्बवाड्यावरची माती खणून घेऊन यायची. माती व्यवस्थित चाळून मऊसूत करून कुजत ठेवायची. तिचा आकार ठरवून माती थापायची. ती कापून त्यावर माती शेणाचा लेप देऊन तुळस तयार केली जायची.

16. मुरारबाजीसारखे शूर वीर युद्धात पडले आणि लढाईचं पारडं फिरलं. मोघलांच्या सेनेबरोबर लढणे शक्य नसल्याचे जाणवल्यावर व्यर्थ प्राणहानी टाळण्यासाठी शिवाजीमहाराजांना नामुष्कीचा पुरंदरचा तह करणं भाग पडलं. मिर्झाच्या हट्टापायी इतर किल्ल्याबरोबरच कोंढाणा हा किल्ला त्यांच्या स्वाधीन करावा लागला.

अचूक पर्याय निवडून कवितेच्या ओळी पूर्ण करून पुन्हा लिहा. (3)

प्रत्येकी 1 गुण एकूण 3 गुण

17. सत्संगत अंतरू नको

18. चंद्रहार गळा

19. श्वास ओले होतील

रिकाम्या जागी पर्यायी शब्दांपैकी योग्य शब्द घालून कवितेच्या ओळी पूर्ण करून पुन्हा लिहा. (2)

प्रत्येकी 1 गुण एकूण 2गुण

20. ज्ञानेश्वरी

21. हवा

कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा. (2)

प्रत्येकी 1 गुण एकूण 2गुण

22. आकाशात उडणाऱ्या पक्षिणीचे लक्ष तिच्या बाळाजवळ असते.
23. शेतामधील झोपडीला बोराटीची झाप आहे.
24. कवित्रीने शहरात स्वप्नं रुजत घालणार असे सांगितले आहे.

कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी तीन ते चार वाक्यांत लिहा. (6)

प्रत्येकी 3गुण एकूण 6 गुण

25. कवी अनंत फंदी यांनी सरळ मार्गानेकसे जगावे हे सांगताना अनेक उपदेश केले आहेत. कठीण वाटेने चालताना सरळ मार्ग सोडू नको. संसारामध्ये उगाच ऐटीने भटकत राहू नको. प्रामाणिकपणा सोडून खोटे बोलू नको. अंगात नम्रता असावी, कुणावर राग धरू नको. आलेल्या पाहुण्याला मुठभर द्यायला विसरू नको. मायबापावर रुसू नको. उगाच उदास होऊ नको. व्यवहारांमध्ये फसू नको. नेहमी मेहनत कर, रिकामा बसू नको. पोट भरण्यासाठी नसत्या उलाढाली करू नको. स्वतः:च्या फायद्यासाठी उगाच कुणाची निंदा किंवा स्तुती करू नको. शहाण्यांची खुशामत कर पण मुर्खाची मैत्री करू नको. कष्टाची भाजी भाकरी खा पण तुपसाखरेचं खाण्यासाठी कुणाची चोरी करू नको. गाठी धनसंचय असेल सत्कार्य करण्यास हटू नको. (यामधील कोणतेही पाच-सहा उपदेश)

26. संत विष्णुदास नामा यांनी परमेश्वराशी असलेले आपले नाते व्यक्त करताना अनेक उदाहरणे दिलेली आहेत. पक्षिणी जरी अंतराळात उडत असली तरी तिचे चित्त आपल्या बाळाजवळ असते. गाई वनात चरायला जातात पण त्यांचं लक्ष आपल्या वासरांवर असते. काही सख्या दुडीवर दुडी ठेवून पाणी आणताना एकमेकांशी गोष्टी करतात पण त्यांचं चित्त मात्र दुडीवर असते. तसेच कवी सुखी संसारात रमला असला तरी मन नेहमी ईश्वरा जवळ असते.

27. इंद्रजीत भालेराव यांनी शेतात राबणाऱ्या कष्टकरी बापाचे वर्णन केले आहे. कवीचा बाप हा शेतकरी असून तो शेतामध्ये रात्रंदिवस राबतो, कष्टतो. अंगावर त्याच्या चिंध्या झालेले कपडे आहेत. मिरची- भाकर खाऊन रात्रंदिवस शेतात मेहनत करतो. उसाचे पाचट काढून जगाला साखर मिळावी, म्हणून कष्ट करतो. त्याच्या नशिबात फक्त कामधंदा आणि कष्टच लिहिलेले आहेत. तो फक्त आपल्या कष्टाचेच खातो.

28. मदत करणे (1)
29. तानाजीने कोंढाणा किल्ला हस्तगत केला. (1)
30. विशेषण (1)
31. शब्दयोगी अव्यय (1)
32. सावळ (1)

33. ढेकळे फोडण्याचे लाकडी साधन (1)

34. ! (1)

35. उत्तीर्ण (1)

36. निरर्थक (1)

37. चेहऱ्यावर निराशा आली. (1)

38. भाववाचक नाम लिहा. (को.1) (1)

देव- देवत्व शहाणा - शहाणपण

39. विशेषण लिहा. (को.1) (1)

बल - बलवान अभ्यास - अभ्यासू

40. लिंग बदलून लिहा. (को. 1) (1)

लेखक - लेखिका शेतकरीण - शेतकरी

41. विरूध्दार्थी शब्द लिहा. (को.1) (1)

चढण × उतरण पराजय × जय / विजय

42. वचन बदलून लिहा. (को. 1) (1)

फुलझाड - फुलझाडे भाषणे - भाषण

43. वाक्य वर्तमान काळात लिहा. (1)

अंगणात तुळशी वृंदावनाची खास जागा आहे.

उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (5)

प्रत्येकी 1 गुण एकूण 5गुण

44. झाडे शुद्ध हवा देतात, थकलेल्यांना आश्रय देतात, छाया देतात, सुगंधी फुले देतात, सुमधुर रसाळ फळे देतात, प्राणी व पक्ष्यांना निवारा आणि अन्न देतात म्हणून झाडांना परोपकारी संत म्हटले जाते.

45. नारळाची झाडे आपल्याला वर्षानुवर्षे मधुर पाण्याने भरलेले नारळ देतात.

46. झाडे 'देते व्हा' हा संदेश देतात.

47. संकटांना भिऊ नका, डगमगू नका, आपली जागा सोडू नका, कर्तव्यात कसूर न करता दक्ष रहा हेच जणू झाडे आपल्या आचरणातून सांगतात.

48. झाडांचे महत्त्व किंवा तत्सम

कविता वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (5)

प्रत्येकी 1 गुण एकूण 5 गुण

49. वाट आपल्याबरोबर चढ उतार घेऊन धावते.
50. आभाळ माणसाला जगण्यास अंत नाही हे सत्य सांगते.
51. नियतीचे खेळ उन्ह सावलीचे आहेत.
52. न्यायाची गंगा उलटी वाहते.
53. फुलाचे मन काट्यात जळते.

54. संवाद लेखन - भाषाशैली, वाक्यरचना, विरामचिन्हे विचारार्थ (5)
~~विषयानुसार गुण द्यावेत प्रत्येक वाक्याला 1 गुण~~ घेऊन गुण द्यावेत. संवादपूर्ती पूर्ण वाक्यात केलेली असावी.

55. औपचारिक पत्र (5)

गुण देताना खालील गोष्टी विचारात घ्याव्यात.

| | |
|---|---|
| पूर्ण पत्ता - | ½ गुण |
| कार्यालयीन पत्ता - | ½ गुण |
| विषय - | ½ गुण |
| संबोधन/अभिवादन - | ½ गुण |
| विषय स्पष्टीकरण - | 2½ गुण |
| शेवट - | ½ गुण |
| एकूण - | 5 गुण |

56. गोष्ट लेखन

गुण देताना खालील गोष्टी विचारात घ्याव्यात.

| | |
|---|---|
| आकर्षक सुरुवात - | ½ गुण |
| गोष्टीचा गाभा - | 2 गुण |
| भाषाशैली - | ½ गुण |
| गोष्टीचा समारोप - | 1 गुण |
| समर्पक शीर्षक - | 1 ~~½~~ गुण |
| एकूण - | 5 गुण |

किंवा (5)

वृत्तान्त लेखन

गुण देताना खालील गोष्टी विचारात घ्याव्यात.

| | |
|---|---|
| दिनांक, स्थळ व क्रमबद्ध घटना - | 2 गुण |
| समग्र चित्रण, एकसुत्रता, भाषाशैली - | 2 गुण |
| एकूण स्वरूप - | 1 गुण |
| एकूण - | 5 गुण |

57. निबंध लेखन (7)

गुण देताना खालील गोष्टींचा विचार करावा.

| | |
|---|---|
| आकर्षक सुरुवात - | 1 गुण |
| विषय मांडणी - | 2 गुण |
| भाषा शुद्धता - | 1 गुण |
| भाषा सौंदर्य - | 2 गुण |
| आकर्षक शेवट - | 1 गुण |
| एकूण - | 7 गुण |